**<u>नियमित दिवाणी मुकदमा क्र. १६५/२०१२ मधील निशाणी १०१ खालील आदेश</u>**

०१. अर्ज व त्यावरील प्रतिवादीचे म्हणणे (नि.१०२) वाचले. वादी यांचे विधिज्ञ श्री. आर. एस्. गव्हाणकर व प्रतिवादीचे विधिज्ञ श्री. एस्.जी. पणदुरकर यांचा युक्तीवाद ऐकला. सदरील अर्ज वादीने भारतीय पुरावा कायदा कलम ७८ (५) नुसार ठरावाची सहिशिक्क्याची नक्क्ल दाखल करण्यासाठी मुख्याधिकारी, नगर परिषद सावंतवाडी यांना साक्षी समन्स काढण्यासाठी दिलेला आहे.

०२. वादीने अर्जात नमुद केले की, त्यांनी सदरचा दावा प्रतिवादीविरूध्द दावा इमल्याच्या वाटपासाठी व पृथक कब्जासाठी दाखल केलेला आहे. दावा इमल्याला प्रतिवादीच्या एकटयाच्या नांवाची नोंद नगर परिषद कर निर्धारण नोंद वहित ज्या ठरावाने करण्यात आली त्या ठरावाची सहिशिक्क्याची नक्कल प्रस्तुतच्या दाव्यात न्यायोचित निकाल होण्यासाठी आवश्यक आहे. त्यामुळे सावंतवाडी नगर परिषदेतील स्थायी समिती किंवा बांधकाम समिती यांनी केलेल्या ठरावाची नक्कल दाखल करण्यासाठी मुख्याधिकारी, नगर परिषद सावंतवाडी यांना साक्षीसमन्स काढण्यात यावे अशी मागणी केली आहे.

०३. प्रतिवादीने प्रस्तुतच्या अर्जावर त्यांचे म्हणणे (नि.१०१) देवून अर्जाला सक्त हरकत घेतली आहे. प्रतिवादीचे म्हणणे की, दाव्यात वादी, प्रतिवादीचा तोंडी पुरावा होवून दाव्यात अंतिम युक्तीवाद झालेला असतांना वादी वेगवेगळया प्रकारचे अर्ज देत आहे व दाव्याचे चौकशीचे कामकाज लांबवित आहे. वादीने या अर्जात ज्या ठरावाची नक्कल दाखल करण्यासाठी साक्षीसमन्स काढण्याची मागणी केली आहे. त्याच ठरावाची नक्कल मिळण्याकरीता यापूर्वी वादीनेच नि.९५ कडे अर्ज केला होता. त्यानुसार मुख्याधिकारी, नगर परिषद सावंतवाडी यांना साक्षीसमन्स पाठवण्यात आले. ते न्यायालयात हजर झाले व त्यांनी वादी मागणी करीत असलेले कागदपत्र दप्तरी आढळून येत नाही असे कळविलेले आहे. त्यामुळे पुन्हा त्याच कारणासाठी साक्षीसमन्स काढण्याची मागणी करता येणार नाही. सबब अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी मागणी केलेली आहे.

०४. प्रस्तुतच्या दाव्यातील कागदपत्र पहाता सदरचा दावा पाच वर्षाहून अधिक जुना आहे. प्रस्तुतच्या दाव्यात वादी, प्रतिवादीचा अंतिम युक्तीवाद झाल्यानंतर वादीने दिलेल्या अर्जानुसार त्यांना पुन्हा पुरावा देण्याची संधी दिलेली आहे. त्यानंतर वादीने नि. ९५ कडे अर्ज दाखल करून दावा इमला म्हणजेच सावंतवाडी नगर परिषद इमला क्र बी—२१८अ संदर्भात वादी, प्रतिवादी क्र. १ ची नांवे सामील करण्याबाबत व त्यानंतर वादीचे नांव कर

निर्धारण नोंदवहितून कमी करण्याबाबतच्या कार्यवाहीची व आदेशाची तसेच संबंधित ठरावाची कागदपत्रे दाव्यात चौकशीकामी आवश्यक असल्यामुळे ते दाखल करण्यासाठी मुख्याधिकारी, नगर परिषद सावंतवाडी यांना साक्षीसमन्स काढण्यात यावे अशी मागणी केली होती. तो अर्ज मंजुर करून मुख्याधिकारी, नगर परिषद सावंतवाडी यांना साक्षीसमन्स काढण्यात आले. त्याप्रमाणे मुख्याधिकारी, नगर परिषद सावंतवाडी हे हजर झाले व त्यांनी नि. ९७ कडे अर्ज देवून कागदपत्र शोधण्यासाठी मुदत मागितली. ती मुदत त्यांना देण्यात आली. त्यानंतर पुढील तारखेला वादीने दिलेल्या नि.९९ कडील अर्जावर मुख्याधिकारी, नगर परिषद सावंतवाडी यांच्याकरीता आलेले प्राधिकृत कर्मचारी आनंद मोतीराम कदम यांनी वादीने मागणी केलेले कागदपत्र सावंतवाडी नगर परिषदेच्या अभिलेख कक्षात अढळ होत नाहीत असे लिहून दिलेले आहे.

०५. वादीने प्रस्तुतच्या अर्जाने यापूर्वी नि. ९५ च्या अर्जाने जे कागदपत्र मागितले होते तेच कागदपत्र पुन्हा मागितलेले असून त्या कागदपत्रासाठी ज्या व्यक्तीला साक्षी समन्स काढण्याची मागणी केलेली होती त्याच व्यक्तीला पुन्हा साक्षीसमन्स काढण्याची मागणी केलेली आहे. नि ९५ च्या आदेशानुसार मुख्याधिकारी, नगर परिषद सावंतवाडी यांनी त्यांच्या अभिलेखात कागदपत्र उपलब्ध नाहीत असे लेखी नि. ९९ च्या अर्जावर लिहून दिलेले आहे. यावरून वादी हे जे कागदपत्र मागत आहेत ते कागदपत्र सावंतवाडी नगर परिषदेच्या अभिलेखात उपलब्ध नाहीत असे यापूर्वी मुख्याधिकारी, नगर परिषद सावंतवाडी यांनी लिहून दिलेले असल्यामुळे पुन्हा त्याच कामासाठी त्यांनाच साक्षीसमन्स काढणे न्यायोचित व कायदेशीर नाही असे दिसते.

०६. सबब वरील बाबींचा विचार करता अर्ज नामंजुर होण्यास पात्र दिसतो. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**—: <u>आ दे श</u> :—**

अर्ज खर्चासह नामंजूर केला.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहीर करणेत आला.)

सही/—
(म. सु. बुधवंत)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
सावंतवाडी.

दिनांक : ११.०४.२०१९.